20 MAY 2026

जनप्रवास

# विद्यापीठ परीक्षा : विविध ५८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून सुरु झाल्या आहेत. १९ मे रोजी विविध ३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ७४ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या असून या परीक्षांसाठी ९१४ विद्यार्थी उपस्थित होते. १९ मे रोजी विविध ५८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून आजअखेर ३५६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. १९ मे रोजी या पथकाकडून सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही.

20 MAY 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तीन लाख विद्यार्थी डिजिटल प्लॅटफॉर्मवर

## ‘अपार आयडी’मध्ये विद्यापीठ देशात तृतीय; एका क्लिकमध्ये समजणार शैक्षणिक प्रगती

संतोष मिठारी :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती एका क्लिकमध्ये उपलब्ध करून देणाऱ्या अपार आयडी (ऑटोमेटेड परमनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्रेशन) निर्मितीत शिवाजी विद्यापीठाने देशात तृतीय स्थान प्राप्त केले आहे. या ‘अपार’द्वारे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ३ लाख ६ हजार ७४६ विद्यार्थ्यांना केंद्र सरकारच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर नवी ओळख मिळाली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा अचूक, डिजिटल मागोवा घेण्यासाठी ‘एक राष्ट्र, एक विद्यार्थी ओळख’ ही संकल्पना लागू केली. याअंतर्गत अपार आणि एबीसी (अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटस) प्रणाली कार्यान्वित केली. त्याच्या अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांसाठी अपार आयडी काढणे बंधनकारक केले. त्याची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाने २०२२-२३ मध्ये सुरू केली. त्यात प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी नोंदणी केलेल्या एकूण ३ लाख ३० हजार ४१९ विद्यार्थ्यांपैकी ३ लाख ६ हजार ९६० जणांनी परीक्षा दिली.

त्यातील तीन लाख सहा हजार ७४६ विद्यार्थ्यांचा अपार आयडी काढला असून, उर्वरीत २३ हजार ७७३ जणांची याबाबतची प्रक्रिया प्रलंबित आहे. या आयडीच्या निर्मितीत विद्यापीठाने देशात तृतीय क्रमांक मिळविला असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

### अपार आयडी महत्त्वाचा का?

‘अपार आयडी’तून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा संपूर्ण तपशील एका ओळख क्रमांकाद्वारे उपलब्ध होणार आहे. त्याने विद्यापीठ, महाविद्यालये, शिक्षण विभागाच्या प्रशासकीय कामकाजात अधिक सुसूत्रता येणार आहे. डिजिटल पडताळणीमुळे खोटी प्रमाणपत्रे किंवा चुकीच्या नोंदी रोखण्यास मदत होणार आहे.

### विद्यार्थ्यांची आकडेवारी दृष्टिपेक्षात (२०२२ ते २०२६)

| जिल्हा | नोंदणी केलेले | परीक्षा दिलेले | अपार आयडी काढलेले | प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| कोल्हापूर | १,७१,९८८ | १५९२९७ | १५८५२० | १३४६८ |
| सांगली | ८९०९७ | ८३१०६ | ८३१४८ | ५९४९ |
| सातारा | ६९३३४ | ६४५५७ | ६५०७८ | ४३५६ |
| **एकूण** | **३,३०,४१९** | **३०६९६०** | **३०६७४६** | **२३७७३** |



### विद्यापीठ ठरले ‘रोल मॉडेल’

पहिल्यांदा विद्यापीठ पातळीसह संलग्नित महाविद्यालयनिहाय नोडल ऑफिसर नेमले. प्रवेशासाठी नोंदणी, परीक्षा अर्ज भरणे, आदी पातळीवर विद्यापीठाने अपार आयडी काढणे बंधनकारक केले. नियोजनबद्ध प्रक्रिया राबविली. त्याचा सकारात्मक परिणाम झाला आणि ९६ टक्के विद्यार्थ्यांची अपार आयडीची नोंदणी झाली. शासनाच्या समन्वय यंत्रणेने विद्यापीठाच्या याबाबतच्या प्रक्रियेची माहिती रोल मॉडेल म्हणून अन्य संस्थांना दिली. विद्यापीठाने गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्रांवर अपार आयडीची नोंद केली आहे.

20 MAY 2026

जनप्रवास

# एमएड् अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात आज इच्छुकांसाठी 'स्नेहभेट'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागाअंतर्गत एमएड अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात व शिक्षणशास्त्र अधिविभागाची ओळख आणि शिक्षण क्षेत्रातील करियर संधी या विषयासंदर्भात इच्छुक उमेदवारांसाठी स्नेहभेटीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी डॉ. विद्यानंद खंडागळे मार्गदर्शन करणार आहेत. बुधवार, २० रोजी सकाळी ११.३० वाजता इच्छुक सर्व प्रवेशार्थींनी शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या छत्रपती शाहू महाराज कक्षेत उपस्थित राहावे, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सारिका पाटील (९८२२९७५६८५), कादंबरी खांडेकर, (८३८१००२९४९) आणि ममता घोटल (९४०३७६७३८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

20 MAY 2026

तरुण भारत

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर परीक्षेच्या ३५६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर



त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल– २०२६ या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील ५८ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले असून आजतागायत ३५६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

मंगळवारी विविध ३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ७४ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ९१४ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेसाठी विद्यापीठाने गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून सांगली, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

20 MAY 2026
पुढारी

# एमएड अभ्यासक्रम प्रवेशासंदर्भात आज 'स्नेहभेट'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागांतर्गत एम.एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात व शिक्षणशास्त्र अधिविभागाची ओळख आणि शिक्षण क्षेत्रातील करिअर संधी या विषयासंदर्भात बुधवारी इच्छुक उमेदवारांसाठी स्नेहभेटीचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. विद्यानंद खंडागळे मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुक सर्व प्रवेशार्थींनी शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या शाहू महाराज कक्षात उपस्थित राहावे, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले आहे.

20 MAY 2026

तरुण भारत

# एम. एड्. अभ्यासक्रम प्रवेश; आज स्नेहभेट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागांतर्गत एम. एड्. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात व शिक्षणशास्त्र अधिविभागाची ओळख आणि शिक्षण क्षेत्रातील करियर संधी या विषयासंदर्भात इच्छुक उमेदवारांसाठी स्नेहभेटीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी डॉ. विद्यानंद खंडागळे मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुक सर्व प्रवेशार्थींनी आज बुधवारी सकाळी ११:३० वाजता शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या छ. शाहू महाराज कक्षात उपस्थित राहावे, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, ममता घोटल यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

20 MAY 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठाच्या समस्या तातडीने सोडवा

## • मंत्री चंद्रकांत पाटील यांचे महापालिकेला निर्देश

**जनप्रवास : मुंबई**

शिवाजी विद्यापीठ येथील विविध प्रलंबित विविध सुविधा विषयक समस्या कोल्हापूर महानगरपालिका यांनी परस्पर समन्वयातून तातडीने सोडवाव्यात, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

मंत्रालयात दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आयोजित संयुक्त बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार अमल महाडीक, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उपसचिव प्रताप लुबाळ, उपसचिव संतोष खोरगडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठ परिसरातील विविध नागरी व पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री श्री. पाटील यांनी महापालिकेने विद्यापीठाला नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवावा, डीपी रोडचे काम तातडीने हाती घ्यावे तसेच विद्यापीठाच्या संरक्षण भिंतीचे काम गतीने पूर्ण करावे, अशा सूचना दिल्या.

ज्या विकासकामांसाठी शासनस्तरावर मंजुरी आवश्यक आहे, त्या संदर्भातील प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. विद्यापीठ परिसरातील घनकचरा नियमितपणे उचलण्याबरोबरच विद्यापीठातील तलावाचा गाळ काढण्यासाठी जागतिक बँकेच्या उपक्रमांतर्गत योजना राबविण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यासही त्यांनी सांगितले.

विद्यापीठ आणि महानगरपालिका यांच्यातील प्रश्न परस्पर समन्वयातून सोडवून विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

20 MAY 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'वारसा सफर'मुळे कलाप्रेमी भारावले

## जागतिक वस्तुसंग्रहालय दिनानिमित्त आयोजन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : जागतिक वस्तुसंग्रहालय दिनानिमित्त कोल्हापूरचा प्राचीन इतिहास, दुर्मीळ शस्त्रे आणि कलावैभवाची ओळख करून देणारा विशेष 'वारसा सफर' उपक्रम राबविला. त्यातील पर्यटक, कलाप्रेमी भारावून गेले.

शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय, पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई आणि कोल्हापूर वस्तुसंग्रहालय विभागीय कार्यालयातर्फे टाऊन हॉल येथील वस्तुसंग्रहालयात सकाळी साडेअकरा ते दुपारी दीड या वेळेत 'वारसा सफर' उपक्रमात संशोधक विद्यार्थी, इतिहासप्रेमी, अभ्यासक, पर्यटक, कलाप्रेमी सहभागी झाले. या उपक्रमात तज्ज्ञ



कोल्हापूर : जागतिक वस्तुसंग्रहालय दिनानिमित्त झालेल्या 'वारसा सफर' उपक्रमात सहभागी पर्यटक, कलाप्रेमी, संशोधक विद्यार्थी, इतिहासप्रेमी.

डॉ. योगेश प्रभुदेसाई, वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप आणि अजय चौगुले यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाचा गौरवशाली इतिहास, ब्रह्मपुरीतील ऐतिहासिक उत्खननात सापडलेल्या सातवाहन कालीन आणि प्राचीन रोमन संस्कृतीशी साधर्म्य दर्शविणाऱ्या दुर्मीळ वस्तू, मूर्ती आणि नाणी यांची माहिती तज्ज्ञांनी दिली. संग्रहालयातील छत्रपती शाहू महाराजांचा काळ आणि मराठा साम्राज्यातील दुर्मीळ शस्त्रास्त्रांची माहिती देण्यात आली. कोल्हापूर स्कूल ऑफ आर्टस् च्या वैभवाची साक्ष देणारी जुनी दुर्मीळ चित्रे पाहून पर्यटक आणि कलाप्रेमी भारावून गेले.

20 MAY 2026

लोकमत

# अतिवृष्टीबाधित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काबाबत परीक्षा मूल्यमापन मंडळ संचालक, विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक, संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, पदवी, पदव्युतर अधिविभाग यांची सोमवारी ऑनलाइन बैठक झाली. यात विविध विषयांवर चर्चा झाली. शासन निर्णयानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील काही तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. यात अंशतः बाधित तालुक्यांमध्ये कागल, शिरोळ, पन्हाळा तर पूर्ण बाधित तालुक्यात करवीर, राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड यांचा समावेश आहे. सांगली जिल्ह्यातील कडेगाव (अंशतः बाधित), मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव, विटा, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ यांचा (पूर्णतः बाधित) समावेश केला आहे. सातारा, कराड, पाटण, फलटण, जावळी हे अंशतः बाधित तर कोरेगाव, खटाव, माण (पूर्णतः बाधित) यांचा समावेश आहे.

## तर प्रस्ताव सादर करू नका

ज्या विद्यार्थांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतला आहे. तसेच अन्य कोणत्याही योजनेतून परीक्षा शुल्क परतावा शासनाकडून घेतला असल्यास त्यांचे प्रस्ताव सादर करू नयेत, असे निर्देश विद्यापीठाने दिले आहेत.

20 MAY 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘अमेरिका-इराण युद्ध : सद्यस्थिती आणि जागतिक परिणाम’ यावर प्रा. डॉ. विजय खरे यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित ‘पुढारी’कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रा. डॉ. विजय खरे यांचे ‘अमेरिका-इराण युद्ध : सद्यस्थिती आणि जागतिक परिणाम’ या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. बुधवारी (दि. २०) सायंकाळी, ५ वाजता गोविंदराव टेंबे रंगमंदिर, गायन समाज देवल क्लब येथे व्याख्यान होणार आहे.

विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. यावर्षीच्या व्याख्यानमालेत डॉ. खरे ३६ वे पुष्प गुंफणार आहेत. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून प्रा. डॉ. विजय खरे यांनी जबाबदारी पार पाडली आहे. पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिक अभ्यास विभागाचे (डीडीएसएस) ते वरिष्ठ प्राध्यापक व विभागप्रमुख आहेत. संरक्षण व सामरिक अभ्यास विभागातील त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी भारतातील पहिला राष्ट्रीय सुरक्षा अभ्यासाक्रमांतर्गत नवीन पंचवार्षिक एकात्मिक एमए, एमएससी अभ्यासक्रम सुरू केला. जागतिक शांतता, सुरक्षा व सामरिक अभ्यासात एमए व संरक्षण व सामरिक अभ्यासात ९ विविध पदव्युत्तर पदविका सुरू केल्या आहेत.

**‘पुढारी’कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला**

## वाहन पार्किंग व्यवस्था

व्याख्यानमालेसाठी येणाऱ्या निमंत्रित मान्यवर व पाहुण्यांसाठी देवल क्लबशेजारी असणाऱ्या प्रायव्हेट हायस्कूलच्या मैदानावर वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष

2 0 MAY 2026

तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मंत्री चंद्रकांत पाटील यांचे महापालिकेला निर्देश

# शिवाजी विद्यापीठाच्या समस्या सोडवा

त.भा. प्रतिनिधी

**मुंबई :** शिवाजी विद्यापीठ येथील विविध प्रलंबित विविध सुविधाविषयक समस्या कोल्हापूर महानगरपालिकेने परस्पर समन्वयातून तातडीने सोडवाव्यात, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. मंत्रालयात दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आयोजित संयुक्त बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस आमदार अमल महाडीक, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उपसचिव प्रताप लुबाळ, उपसचिव संतोष खोरगडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## संबंधित विभागांनी सातत्याने पाठपुरावा करावा

**विद्यापीठ आणि महानगरपालिका यांच्यातील प्रश्न परस्पर समन्वयातून सोडवून विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यावर बैठकीत भर देण्यात आला. विकासकामांमध्ये कोणताही अडथळा येऊ नये यासाठी संबंधित विभागांनी सातत्याने पाठपुरावा करावा, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.**



विद्यापीठ परिसरातील विविध नागरी व पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री पाटील यांनी महापालिकेने विद्यापीठाला नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवावा, डीपी रोडचे काम तातडीने हाती घ्यावे तसेच विद्यापीठाच्या संरक्षण भिंतीचे काम गतीने पूर्ण करावे, अशा सूचना दिल्या.

ज्या विकासकामांसाठी शासनस्तरावर मंजुरी आवश्यक आहे, त्या संदर्भातील प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. विद्यापीठ परिसरातील घनकचरा नियमितपणे उचलण्याबरोबरच विद्यापीठातील तलावाचा गाळ काढण्यासाठी जागतिक बँकेच्या उपक्रमांतर्गत योजना राबविण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यासही त्यांनी सांगितले.